Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Smruti Arogya & Shikshan Prasarak Mandal, Khamgaon

Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon, Dist. Buldana

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati College Code 334

12 (B) Dated 11 June 2012
2 (f) Dated 20 Oct.2011
Permanent Affiliation- L.No.SGBAU/8/C-300/2012
Dated-22 Feb.2012

Web.Site : www.smbscoll.com
Email.:smbsartscoll@rediffmail.com
Mob.:9552619216

Ref.No.

Date: 22/02/2023

Certificate

This is to certify that the documents attached in **Criterion-VII: Institutional Values and Best Practices** are verified and found correct to the best of my knowledge

Principal
Sahakar Maharshi
Late Bhaskarrao Shingne Arts
College,Khamgaon Dist.Buldana



Shelodi Road, Khamgaon, Dist Buldhana 444 303 (M.S.)

Environmental Protection and Conservation

Session 2017-2018

Index

Sr. No.	Name of Activity / Programme	Page No
1	Various activity carried out by the institution in relation to green environment protection and conservation	2
2	Cleanness campaign in Government hospital	3 to 5
3	Swachhata Abhiyan Fortnight	6 to 8
4	Plastic free campaign	9 to 11

Various activities carried out by the institution in relation to green campus and environment

Cleanliness campaign in Govt. hospital

Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: सरकारी दवाखान्यात स्वच्छता अभियान.

3) Name of the main Speaker: Dr. N. D. Deshmukh, Dr. Raut

4) Brief Report :- दरवर्षी च्या प्रमाणे सरकारी दवाखान्यात स्वच्छता अभियान राबविण्यात येते. मानव संसाधन विकास कनिष्ठ महाविद्यालय दिघी व संत गाडगे बाबा आश्रम तिर्डी यांच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सामान्य रुग्णालय हदगाव स्वच्छता याबद्दल माहिती व स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

5) Aim of the programme:
① दवाखान्यातील वातावरण स्वच्छ राहावे
② रोगांना प्रतिबंध करावे.

6) Number of Students (a list of students): 39

7) Number of Teachers: 02

8) Photo Copies (Geo-tagging photo) : photo

9) News paper News paper Cutting.

10) Date of the programme: 25/09/2017

11) Progeamme outcome
① या विद्यालयातून सामान्य रुग्णालय स्वच्छ दिसू लागले.
② आजच्या युवकांनी रुग्णालयातील उणीव जाणल्या आहेत त्यांनी त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा.

Signature
Name of Teacher
Asst. Professor

S.M.B.S. Arts College

जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वच्छता अभियान राबवितांना मान्यवर डावीकडून डॉ. सोहन डॉ. दयानंद राठोड (जिल्हा शल्यचिकित्सक खामगांव)

शिंगणे महाविद्यालयाच्यावतीने सामान्य रुग्णालयात स्वच्छता अभियान

कार्यालय प्रतिनिधी/९ सप्टेंबर

खामगाव : स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्थानिक सामान्य रुग्णालय येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी मानव संसाधन मंत्रालय दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या पत्रानुसार तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या पत्रानुसार स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्रत्येकाला स्वच्छतेचे महत्त्व कळावे, यासाठी सदर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छ भारत सुंदर भारत अशा घोषणा देखील विद्यार्थ्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे कार्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निलिमा देशमुख यांनी केले. स्वच्छतेमुळे आरोग्य चांगले राहते, दवाखान्यात जायचे काम पडत नाही. यासाठी स्वच्छता अभियानाची सुरवात शासकीय रुग्णालयापासून करण्यात आली.

सामान्य रुग्णालय परिसरात स्वच्छता करताना रासेयो विद्यार्थी-विद्यार्थिनी

यावेळी सदर स्वच्छता अभियानाचे आयोजन प्रा.डॉ. दयानंद राऊत यांनी केले होते.

या अभियानांमध्ये सुरज हटकर, सुरज सहस्त्रबुध्दे, माधव नायसे, दिनकर जवंजाळ, जयश्री राठोड, कोमल सूर्यवंशी, प्रियंका निळे, मोनिका इंगळे, पुजा हेलोडे आदी विद्यार्थ्यांनी व इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

S.M.B.S. Arts College Khamgaon

Swachhata Abhiyan Fortnight

Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: स्वच्छता अभियान

3) Name of the main Speaker: Dr. N. D. Deshmukh, Dr. Raut.

4) Brief Report :- विद्यापीठाच्या निर्देशानुसार स्वच्छोत्सव पंधरवडा साजरा करणे, विद्यार्थिनी स्वच्छता अभियान राबविणे जसे की, बस स्टँड, पोलिस स्टेशन, वाचनालय, सार्वजनिक रुग्णालय इत्यादि. त्यांची महाविद्यालयाचे परिसर स्वच्छता अभियान राबविणे साजरा.

5) Aim of the programme: ① स्वच्छतेचे महत्व जनतेला पटवून देणे व त्यांना प्रत्यक्ष सहभागी करणे.
② विद्यार्थिनी स्वच्छतेची सवय लावणे.

6) Number of Students (a list of students): 32

7) Number of Teachers: 02

8) Photo Copies (Geo-tagging photo) : Photo

9) News paper :- Yes, News paper Cutting

10) Date :- 13/09/2017

11) Out Comes :-
① सर्व विद्यार्थिनी स्वच्छता अभियान राबविले त्यांना स्वच्छतेचे महत्व कळले
② विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व सार्वजनिक ठिकाणी साजरा करणे. परिसर स्वच्छ ठेवणे.

Signature

Name of Teacher Dr. D. D. Raut

S.M.B.S. Arts College Khamgaon

शिंगणे कॉलेजने राबविला स्वच्छता अभियान पंधरवाडा

कार्यालय प्रतिनिधी/ १३ सप्टेंबर

खामगाव : स्थानिक सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयामध्ये रासेयोच्या माध्यमातून स्वच्छता अभियान पंधरवाडा राबविण्यात येत असून १३ सप्टेंबर रोजी महाविद्यालयातील परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच रोज वेगवेगळ्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. शासकीय हॉस्पीटल, महाविद्यालयाचा परिसर अशा अनेक ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. सदर अभियान प्राचार्या डॉ.निलिमा देशमुख यांच्या नेतृत्वात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.दयानंद राऊत यांनी यशस्वीपणे राबविले.

या अभियानामध्ये डॉ.प्रमोद चव्हाण, प्रा.मनोहर वाँसनिक, प्रा.विश्वकर्मा प्रा.राखोंडे, प्रा.जवकार मॅडम यांचे सहकार्य लाभले. प्रियंका निळे, शालीनी गोळे, कोमल सूर्यवंशी, मोनिका इंगळे, प्रतिमा इंगळे, राजू वानखडे, संदीप वानखडे, निलेश शिंदे आदी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्वच्छता अभियान राबवितांना रासेयो विद्यार्थी

14/09/2017

Programme Officer
National Service Scheme
Sahakar Maharshi Late Bhashkarrao
Shingne Arts College, Khamgaon

S.M.B.S. Arts College Khamgaon

Principal
Sahakar Maharshi Late Bhash
Shingne Arts, Science and Comme
College Khamg

Plastic free campaign

Report

1) Title of the Activity : Extension Acativity

2) Name of the programme: प्लॅस्टिक मुक्त अभियान

3) Name of the main Speaker: Dr. Raut, Prof Raklendle

4) Brief Report :- प्रत्येक वर्षी आमच्या महाविद्यालयाची माजी विद्यार्थी कांबळे वकील महोदय गेल्यानंतर जो कचरा होतो तो आम्ही विद्यार्थी करतो.

5) Aim of the programme:
① प्लॅस्टिक मुक्त परिसर करणे
② प्लॅस्टिक हे जनावरांसाठी आणि माणसांसाठी हानिकारक आहे हे पटवून देणे

6) Number of Students (a list of students):
24

7) Number of Teachers: 02

8) Photo Copies (Geo-tagging photo) : Photo

9) News paper :- News Paper Cutting

10) Date :- 9/09/2017

11) Out Comes :- ① प्लॅस्टिक हे जनावरांसाठी विषारक आहे हे विद्यार्थ्यांना कळले
② प्लॅस्टिक हे हे जनावरांसाठी आणि माणसांसाठी हानिकारक आहे कळले

Signature
Name of Teacher
Dr. D. U. Raut

S.M.B.S. Arts College Khamgaon

जनजागृती करणार। महाविद्यालयापासून केली सुरुवात

प्लास्टिक मुक्तीसाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार!

प्लास्टिकचा वापर न करण्याची शपथ!

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर न करण्याची शपथ घेतली. स्वत:सोबतच इतरांनाही प्लास्टिक वापरापासून परावृत्त करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला. यासाठी विद्यार्थ्यांकडून शहरासह, ग्रामीण भागातही जाऊन प्लास्टिक मुक्ती अभियान राबविण्यात येणार आहे.



प्लास्टिक मुक्ती अभियानाचा शुभारंभ करताना विद्यार्थी.

लोकमत न्यूज नेटवर्क

खामगाव : प्लास्टिक वापरामुळे होणारे दुष्परिणाम थांबावेत, यासाठी खामगाव येथील सहकार, महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अभियान सुरु केले आहे. महाविद्यालयाचा परिसर प्लास्टिक मुक्त करुन या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. प्लास्टिकमधील अन्नाचे सेवन केल्या जाते. याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. जनावरांच्या पोटात प्लास्टिक गेल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो., असे मार्गदर्शन प्राचार्या डॉ. नीलिमा देशमुख यांनी केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करुन स्वच्छता अभियान राबविले. यादेळी डॉ. दयानंद राऊत, डॉ. हर्षा ढाले, डॉ. प्रमोद चव्हाण, प्रा. सोमल राखोंडे, प्रा. पल्लवी सातव, प्रा. मलका कळणे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)

व्यसनमुक्ती कार्यशाळा

प्लास्टिक मुक्तीसोबतच महाविद्यालयाच्या वतीने व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय कुलकर्णा अंतर्गत तंबाखूमुक्त अभियान राबविण्यात आले. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. १७ जानेवारी रोजी तंबाखूचे दुष्परिणाम व उपाययोजना या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना प्राचार्या डॉ. नीलिमा देशमुख, प्रा. योगेश विश्वकर्मा यांनी बक्षीस व प्रमाणपत्र दिले.

S.M.B.S. Arts College Khamgaon

Environmental Protection and Conservation

Session 2018-2019

Index

Sr. No.	Name of Activity / Programme	Page No
1	Eco-friendly Ganesh idol training workshop	13 to 15
2	Cleanness drive at bus stand	16 to 17
3	Organic fertilizer manufacturing project	18 to 20

Eco-friendly Ganesh Idol Training Workshop

Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: पर्यावरणपूरक गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा

3) Name of the main Speaker: श्री. हरि. एम. मुरव (सेंद्रीय शेतकरी खामगांव.)

4) Brief Report :- पर्यावरण आणि पर्यावरणा मूर्ती याबाबत विस्तृत माहिती असलेली माणिक्या मूर्तीची स्थापना व्यायला पाहिजे यासाठी माणिक्या मूर्तीचे महिमा) बोलावून गेले. पर्यावरणाचे संरक्षण व्हावे यासाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा बोलावण्यात आली.

5) Aim of the programme: ① पर्यावरणाचे संरक्षण करणे.
② लोकांना माणिक्या मूर्तीची प्रतिष्ठापना करायला लावणे

6) Number of Students (a list of students): 34 जणांचे.

7) Number of Teachers: 02

8) Photo Copies (Geo-tagging photo) : Photo

9) News paper :- News paper Cutting

10) Date :- 10/09/2018

11) Out Comes :- ① विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व कळले.
② लोकं माणिक्या मूर्तीची स्थापना करायला लागले

Signature

Name of Teacher
Dr. D. V. [illegible]

S.M.B.S. Arts College * Khamgaon *

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय
खामगांव जि. बुलडाणा

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय
खामगांव जि. बुलडाणा

लोकमत अकोला, शुक्रवार, दि. २१ सप्टेंबर २०१८ ४

स्पर्धेतून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन

स्व. शिंगणे महाविद्यालयाचा पुढाकार: दहा वर्षांपासून उपक्रम

देवेंद्र ठाकरे
लोकमत न्यूज नेटवर्क

खामगाव: शहरातील स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालयाच्या वतीने गेल्या आठ ते दहा वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या माध्यमातून पर्यावरणाची होत असलेली हानी टाळण्याचे आवाहन करतानाच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याचे काम महाविद्यालयाकडून होत आहे.

स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालयाच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा हा याचाच एक भाग आहे. गणेशोत्सवादरम्यान आतापर्यंत प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्त्या आणण्यात येत होत्या. सदर मूर्ती पाण्यात विरघळत नाहीत. गणपतीच्या अवतीभोवती करण्यात येणारी सजावट ही प्लास्टिकपासून बनविलेल्या उत्पादनांची केली जाते. यासह विविध बाबी पर्यावरणाला हानीकारक ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरणपूरक सण, उत्सव साजरे करावेत, यासाठी महाविद्यालयाने पुढाकार घेतला. सणांकडे गणपती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. त्यामुळे पर्यावरण रक्षणाच्या या कार्यात जास्तीत जास्त मंडळांनी सहभाग घ्यावा, यासाठी महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात येते. ज्या मंडळांनी पर्यावरणपूरक गणेश मूर्तींची स्थापना केली, अशा मंडळांसाठी ही स्पर्धा आहे. महाविद्यालयाच्या वतीने स्पर्धेत सहभागी शहरातील गणेश मंडळांची पाहणी करण्यात येते. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची तपासणी यादरम्यान महाविद्यालयाकडून करण्यात येते. यानंतर उत्कृष्ट मंडळांना प्रथम, द्वितीय, तृतीय पुरस्कार दिले जातात.

वार्षिक स्नेहसंमेलनात पुरस्काराचे वितरण

स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालयाच्या वतीने गणेशोत्सव काळात स्पर्धेत सहभागी गणेश मंडळांची तपासणी करण्यात येते. यात पहिल्या तीन मंडळांची निवड करुन महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात यशोस वितरण करण्यात येते. यावर्षीही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, गणेशोत्सव मंडळ सहभागी होत असल्याचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. दयानंद राऊत यांनी सांगितले.

लोकमत शुभ वर्तमान

> पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनीच पुढाकार घेण्याची गरज आहे. महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सव स्पर्धेच्या माध्यमातून गेल्या आठ ते दहा वर्षांपासून हा प्रयत्न करण्यात येत आहे.
>
> - डॉ.निलीमा देशमुख, प्राचार्या.

लोकमत अकोला, सोमवार, १० सप्टेंबर २०१८ ४

पर्यावरणपूरक गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

खामगाव : स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण तथा कार्यशाळा घेण्यात आली.

गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण एस.एम. गुरव यांनी दिले. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीमुळे जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. या मूर्ती पाण्यात विरघळत नाहीत. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेश मूर्तीची स्थापना प्रत्येकाने आपापल्या घरी करावी, असे गुरव म्हणाले. विचार मंचावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. दयानंद राऊत उपस्थित होते. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीलिमा देशमुख यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

यावेळी प्रा. डॉ. राऊत यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरणाचा समतोल राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे यासाठी आपण दक्ष असलो पाहिजे. पर्यावरणपूरक गणेश मूर्तीची स्थापना करावी, यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यापासून बचाव होतो, असे डॉ. राऊत यावेळी म्हणाले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. (प्रतिनिधी)

Cleanliness drive at Bus stand

Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: बस स्टँडवर स्वच्छता अभियान

3) Name of the main Speaker: Dr. M. D. Deshmukh, Dr. Raut, Dr. Yeole

4) Brief report: 15 ~~सप्टेंबर~~ ते 2 ऑक्टोबर या दरम्यान विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान पंधरवाडा साजरा केला. आपण बघतोय स्वच्छता अभियानाची लोकांना कामाची व, स्वच्छता लोकांना देण्यासाठी

5) Aim of the Activity : कळावी यासाठी बसस्टँड स्वच्छता अभियान राबविले

① बस स्टँडवरील लोकांना स्वच्छतेचे महत्व जाणणे.

② विद्यार्थ्यांना देखील स्वच्छतेची सवय लागावी.

6) Number of Students (a list of students): 32

7) Number of Teachers: 02 Dr. D. D. Raut, Dr. H. P. Yeole.

8) Outcomes : ① लोकांना स्वच्छतेचे महत्व कळले.

② विद्यार्थ्यांनी घरी, व कॉलेजपरिसर स्वच्छता ~~परिसर~~ ठेवण्यास सुरुवात केली.

9) Photo Copies (Geo-tagging photo) : photo

10) News paper : News Paper Cutting

11) Date :- 28/09/2018

Signature
Name of Teacher
Dr. D. D. Raut

लोकमत अकोला शुक्रवार, २८ सप्टेंबर २०१८

विद्यार्थ्यांनी केली बसस्थानक परिसराची स्वच्छता!

लोकमत न्यूज नेटवर्क

खामगाव: 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत स्थानिक स्व.भास्करराव शिंगणे महाविद्यालयाच्यावतीने बसस्थानक परिसराची स्वच्छता करण्यात आली.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत आहे. यांतर्गत महाविद्यालयाच्यावतीने महाविद्यालय परिसर, सामान्य रुग्णालय, पिंप्री गवळी, लाखनवाडा, आसा, हिंगणा कारेगाव, गारडगाव आदी ठिकाणीसुद्धा रासेयो विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले.



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीलिमा देशमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दयानंद राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मंगेश वानखडे, आकाश वाकोडे, कैलास वैराळे, खंडुजी डवले, अतुल शेजोळे यांच्यासह अनेक विद्यार्थी स्वच्छता पंधरवडा अंतर्गत विविध ठिकाणी स्वच्छता अभियान राबवित आहेत.

(प्रतिनिधी)

Organic Fertilizer Manufacturing Project

Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: सेंद्रिय खत निर्मिती

3) Name of the main Speaker: मा. नवनाथ पाटिल

4) Brief Report :- नगर परिसरातील कचऱ्यापासून विद्यार्थ्यांनी निर्माल्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजीकता व कार्य वृत्ती वाढली. सेंद्रिय खत प्रकल्प राबविण्यात आला.

5) Aim of the programme: ① निर्माल्याचा योग्य विनियोग करणे
② सेंद्रिय खत तयार करणे.

6) Number of Students (a list of students): 22

7) Number of Teachers: 62

8) Photo Copies (Geo-tagging photo) : Photo

9) News paper :- News paper Cutting

10) Date :- 18/09/2018 (मंगळवार)

11) Out Comes :-
① निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.
② सेंद्रिय खत शेतकऱ्यांना फायदेशीर आहे

Signature
Name of Teacher
Dr

शिंगणे कॉलेजचा सेंद्रिय खत प्रकल्प स्तुत्य उपक्रम - पाटील

खामगाव : स्थानिक सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेव्दारे स्वच्छता हीच सेवा या उपक्रमाबरोबर सेंद्रीय खताचा प्रकल्प अतिशय प्रशंसनीय आहे, असे उद्‌गार वाडी येथील वसंतराव पाटील यांनी काढले. गणेश उत्सव हा दहा दिवस साजरा केला जातो. या दहा दिवसातील संपुर्ण निर्माल्य नगर परिषदेने भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाला दिले.

सेंद्रिय खत प्रकल्पाला भेटप्रसंगी वसंत पाटील, डॉ.सद्‌गुणराव देशमुख व इतर

नगर परिषदेच्या सहकार्याने कॉलेजच्या परिसरात निर्माल्याचा योग्य वापर व्हावा, यासाठी सेंद्रीय खत निर्माण प्रकल्प उभारण्यात आला. शिक्षणाबरोबर समाजोपयोगी कार्य व्हावे यासाठी महाविद्यालयात सेंद्रीय खत प्रकल्प उभा करण्यात आला. सेंद्रीय खताचे तंत्रज्ञान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अवगत व्हावे यासाठी हा उपक्रम स्तुत्य ठरणार असल्याचे वसंतराव पाटील म्हणाले. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी देखील या उपक्रमाची प्रशंसा केली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ.सद्‌गुणराव देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.निलीमा देशमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.दयानंद राऊत, प्रा.मनोहर वासनिक, प्रा.संदीप लांडे, प्रा.गोपाल राखोंडे, प्रा.विश्वकर्मा व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

Environmental Protection and Conservation

Session 2019-2020

Index

Sr. No.	Name of Activity / Programme	Page No
1	Plastic free campaign on Khamgaon to Shegaon road	22 to 23
2	Tree Plantation at Antraj village	24 to 26
3	Sanitation award received by the college	27 to 28
4	Environment award received by the college	29 to 34
5	Various work's done by the college in relation to Environmental Protection and Conservation	35 to 36

Plastic free campaign on Khamgaon to Shegaon road



Report

1) Title of the Activity : Extension Activity

2) Name of the programme: प्लॅस्टिक मुक्त अभियान खामगाव ते शेगाव रोड

3) Name of the main Speaker: मा. डॉ. साळुंके, प्रा. राठोड, प्रा. ठाकूर

4) Brief Report :- प्रत्येक वर्षी राष्ट्रीय सेवा योजना पदाधिकारी खामगाव ते शेगाव रस्त्यावरील गाजानन महाराज मंदिर ते आकोली गोळाप्रमाणात प्लॅस्टिक मुक्त रस्ता व्हावा. ते उद्देशाने हा

5) Aim of the programme: विद्यार्थ्यांनी खालील..

① प्लॅस्टिक मुक्त रस्ता व्हावा

② प्लॅस्टिक हे मानव व पर्यावरणाला हानिकारक आहे.

6) Number of Students (a list of students):

48

7) Number of Teachers: 3

8) Photo Copies (Geo-tagging photo) : Photo

9) News paper :- News Paper Cutting.

10) Date :- 5/12/~~2019~~ 2019

11) Out Comes :-

① रस्ता प्लॅस्टिक मुक्त झाला

② नागरिक प्लॅस्टिक वापरणे बंद केले.

Name of
Dr. D. U Ra

संत गजानन महाराज पालखी मार्गावर
रासेयोने राबविले स्वच्छता अभियान

पालखी मार्गावर स्वच्छता मिशन राबवितांना विद्यार्थी व शिक्षक

कार्यालय प्रतिनिधी/८ ऑगस्ट

खामगाव : स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत अभियान राबविण्यात आले.

दरवर्षी गजानन महाराजाची पालखी खामगाववरुन शेगावला जाते. रस्त्यात अनेक सेवाभावी संस्था रस्त्याच्यामध्ये चहा, नास्ता देतात. त्यामुळे रस्त्यावर चहाचे कप, द्रोण, पत्रावळी इत्यादी कचरा होतो. तेव्हा महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.दयानंद राऊत यांच्या नेतृत्वात साफसफाई केली. साफसफाला सकाळी ८

शिंगणे कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा उपक्रम

वाजता सुरुवात करण्यात आली. अभियान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.निलीमा देशमुख यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आले.

या अभियानामध्ये एन.सी.सी.चे विद्यार्थी प्रा.गोपाल राखोंडे यांच्या नेतृत्वात सहभागी झाले होते. या अभियानामध्ये भारती सरदार पुनम हिवरकार, प्रतिभा निमखेडे व इतर विद्यार्थी सहभागी झाले होते. येणाऱ्या वारकरी भाविक स्वयंसेवकांचे कौतुक करीत होते.

Tree Plantation at Antraj Village

Report

1) Title of the Activity : ~~Extension~~ Activity

2) Name of the programme: अंत्रज येथे वृक्षारोपण

3) Name of the main Speaker: Dr. N. D. Deshmukh

4) Brief Report :- दरवर्षी मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करते. यावेळी कॉलेज मा गावामध्ये व शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेतले. यावेळी गावचे सरपंच ढिका मुखाले व शाळेचे मुख्याध्यापक लाडुकर, व बरोबर शाळा उपस्थित होते

5) Aim of the programme:
① मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे
② गावकऱ्यांना वृक्षाचे महत्व सांगणे.

6) Number of Students (a list of students):
24

7) Number of Teachers: 02

8) Photo Copies (Geo-tagging photo) : photo

9) News paper :- News paper Cutting

10) Date :- सप्टेंबर 2019-20 (21/08/2019)

11) Out Comes :-
① गावकरी लोकांनी स्वतः वृक्ष लावून त्यांची जोपासना केली.
② विद्यार्थी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करित असतात.

Signature

Name of Teacher
D. U Raut

S.M.B.S. Arts College

अंत्रज येथील महात्मा फुले विद्यालयाच्या परीसरात वृक्षारोपण करतांना महाविद्यालयाचे विद्यार्थी

अंत्रज येथील महात्मा फुले विद्यालयाच्या परीसरात वृक्षारोपण करतांना गावचे सरपंच श्री शिवराज महावले व बाळासाहेब बगाडे

S.M.B.S. Arts College Khamgaon

विद्यार्थ्यांचे अंत्रज येथे वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

खामगाव: स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अंत्रज येथे वृक्षारोपण करण्यात आले.

शासनाच्या वृक्षलागवड मोहिमेला प्रतिसाद देत महाविद्यालयाच्या वतीने २६० पेक्षा जास्त वृक्ष रोपट्यांची लागवड करण्यात आली. वन परिक्षेत्र खामगावकडून निंबाची झाडे खरेदी करून रस्त्याच्या दोन्ही बाजूने तसेच महात्मा फुले शाळेच्या आवारात व प्राथमिक शाळेच्या आवारात वृक्षारोपण केले. यावेळी सरपंच शिवा महाले, मुख्याध्यापक लाहुडकर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षारोपण करताना विद्यार्थिनी.

यावेळी शाळेच्या मुलांना वृक्ष वाटप करुन त्या वृक्ष संवर्धनाची जबाबदारी तुमची आहे, असे सांगण्यात आले. डॉ. दयानंद खरुल यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम पार पडला. (प्रतिनिधी)

Sanitation Award received by the college

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना

जिल्हा स्तरीय पुरस्कार

सत्र २०१८-१९

प्रमाणपत्र

सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय

खामगाव, जि. बुलडाणा

डॉ. दयानंद राऊत
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

डॉ. निलीमा देशमुख
प्राचार्य

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत

शैक्षणिक कार्यासोबत उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल

पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येत आहे.

डॉ. राजेश बुरंगे
प्र.संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. मुरलीधर चांदेकर
कुलगुरु

दि. ५ ऑगस्ट २०१९

''स्वच्छ भारत अभियान''

Sanitation Award given to the college in 2019-20 by Hon`ble Vice -Chancellor

Environment Award received by the college

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

पर्यावरण पुरस्कार - २०२०

श्री / श्रीमती - सहकार महर्षी स्व. भास्करराव डिंगणे कला महाविद्यालय, खामगांव, जि. बुलढाणा यांना पर्यावरणासंबंधी वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, जलव्यवस्थापन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्रोताचा वापर यामध्ये प्रत्यक्ष केलेल्या भरीव कार्याबद्दल व यासंबंधी जनजागरणातील योगदानाबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे '' अ '' गटातून '' पर्यावरण पुरस्कार - २०२० '' गौरवपुर्वक प्रदान करण्यात येत आहे.

अध्यक्ष
पुरस्कार निवड समिती
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

स्थळ: अमरावती
दिनांक: ०१/०५/२०२१



Vision
SEVEN SOCIAL SINS
Mission
2021/5/28 12:34

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

☎ : २६६२२०६, २६६२२०७, २६६२२०८, २६६२२४९, २६६२३५८ फॅक्स: ०७२१-२६६२१३५, २६६०९४९ ग्राम : SGBAMUNI
वेबसाईट : www.sgbau.ac.in

उद्यान विभाग
क्र.संगाबाअवि/१६/**१५३**/२०२०
दि. २४/१०/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय,
खामगांव, जि. बुलढाणा.

विषय :- पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२० च्या प्रत्यक्ष प्रक्षेत्रीय भेटीबाबत.
संदर्भ :- १. क्र.संगाबाअवि/१६/**१३८**/२०२०, दि. ०७/१०/२०२०
२. क्र.संगाबाअवि/१६/**१४८**/२०२०, दि. १५/१०/२०२०

महोदय,

विषयांकित बाबीसंबंधी संदर्भिय पत्र क्र. १ नुसार **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** शुक्रवार, दि. १६/१०/२०२० रोजी दुपारी - १२.०० वाजता संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देण्याचे कळविण्यात आलेले होते.

परंतु मा. अध्यक्षांच्या निर्देशांन्वये काही अपरिहार्य कारणास्तव **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** दि. १६/१०/२०२० रोजी नियोजीत वेळेस आपल्या संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देवू शकणार नाही, असे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये आपणांस कळविण्यात आलेले होते.

मा. अध्यक्षांच्या निर्देशांन्वये पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२० **रविवार, दि. ०१/११/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता** आपण केलेल्या कार्याचे प्रत्यक्ष प्रक्षेत्राला भेट देणार आहे.

कृपया नोंद घेवून सहकार्य करावे.

ही विनंती.

24.10.2020

उद्यान अधिक्षक
तथा सदस्य सचिव.
पर्यावरण पुरस्कार निवड समिती - २०२०
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मो. नं. ९९२२९१११०१
ई-मेल – www.anilghom@sgbau.ac.in

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४६०२
(महाराष्ट्र)

☎ : २६६२२०६, २६६२२०७, २६६२२०८, २६६२२४९, २६६२३५८. फॅक्स : ०७२१-२६६०९४९, २६६२१३५
वेबसाईट : www.sgbau.ac.in

उद्यान विभाग
क्र.संगाबाअवि/16/ 78 /2021
दि. 26 /04/2021

प्रति,
प्राचार्य,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय,
खामगांव, जि. बुलढाणा.

विषय :- ***पर्यावरण पुरस्कार – 2020 करिता निवड झाल्याबाबत अभिनंदन पत्र.***

महोदय,

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे वतीने दिला जाणारा पर्यावरण पुरस्कार – 2020 करिता "अ" गटातून आपल्या महाविद्यालयाची निवड करण्यात आलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. पुरस्कार वितरण सोहळा आभासी पध्दतीने (online) दि. 01/05/2021 रोजी सकाळी 10.30 वाजता सुरु होणार आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु. 15,000/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र असे आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, पुरस्कार वितरण सोहळ्याला दि. 01/05/2021 रोजी सकाळी 10.20 ते 10.50 पर्यंत विद्यापीठाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या **Youtube link** *च्या सहाय्याने आपणासोबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी आणि त्यांचे कुटूंबिय, सहकारी व मित्रमंडळी सदर समारंभास आभासी पध्दतीने (online) आपआपल्या ठिकाणी उपस्थित राहुन पाहू शकता.*

कोविड - 19 च्या प्रादुर्भाव व लॉकडाऊन मुळे सदर पुरस्कार आभासी पध्दतीने (online) वितरित होणार आहे.

पुरस्कार वितरणाची **Youtube link** *आपल्या भ्रमणध्वनीवर दि. 30/04/2021 पर्यंत पाठविण्यात येईल, सदर समारंभास उपस्थित राहावे.*

आपला

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

☎ : २६६२२०६, २६६२२०७, २६६२२०८, २६६२२४९, २६६२३५८ **फॅक्स:** ०७२१-२६६२१३५, २६६०९४९ ग्राम : SGBAMUNI
बेबसाईट : www.sgbau.ac.in

उद्यान विभाग
क्र.संगाबाअवि/१६/१७३/२०२०
दि. ०७/१२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय,
खामगांव, जि. बुलढाणा.

विषय :- पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२० च्या प्रत्यक्ष प्रक्षेत्रीय भेटीबाबत.
संदर्भ :- १. क्र.संगाबाअवि/१६/**१३८**/२०२०, दि. ०७/१०/२०२०
२. क्र.संगाबाअवि/१६/**१४८**/२०२०, दि. १५/१०/२०२०
३. क्र.संगाबाअवि/१६/**१५३**/२०२०, दि. २४/१०/२०२०
४. क्र.संगाबाअवि/१६/**१५८**/२०२०, दि. ०२/११/२०२०

महोदय,

विषयांकित बाबीसंबंधी संदर्भिय पत्र क्र. १ नुसार **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** शुक्रवार, दि. १६/१०/२०२० रोजी दुपारी - १२.०० वाजता संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देण्याचे कळविण्यात आलेले होते.

मा. अध्यक्षांच्या निर्देशांन्वये काही अपरिहार्य कारणास्तव **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** दि. १६/१०/२०२० रोजी नियोजीत वेळेस आपल्या संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देवू शकणार नाही, असे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये आपणांस कळविण्यात आलेले होते.

संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** रविवार, दि. ०१/११/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देण्याचे कळविण्यात आलेले होते.

परंतु मा. अध्यक्षांच्या निर्देशान्वये काही अपिहार्य कारणास्तव **"पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२०"** रविवार, दि. ०१/११/२०२० रोजी नियोजीत वेळेस आपल्या संस्थेने केलेल्या कार्याला / प्रक्षेत्राला भेट देवू शकणार नाही. असे संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये आपणांस कळविण्यात आलेले होते.

मा. अध्यक्षांच्या निर्देशांन्वये पर्यावरण पुरस्कार निवड समिती – २०२० **शुक्रवार, दि. ११/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता** आपण केलेल्या कार्याचे प्रत्यक्ष प्रक्षेत्राला भेट देणार आहे.

कृपया नोंद घेवून सहकार्य करावे.
ही विनंती.

07.12.2020

उद्यान अधिक्षक
तथा सदस्य सचिव.
पर्यावरण पुरस्कार निवड समिती - २०२०
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मो. नं. ९९२२९१११०१
ई-मेल – www.anilghom@sgbau.ac.in

महाराष्ट्रातील एकमेव स्वतंत्र दैनिक
अजिंक्य भारत

स्व.शिंगणे कॉलेजला पर्यावरण पुरस्कार

२ विद्यापीठाने पर्यावरणाचे संवर्धन करण्याकरीता राबविलेल्या विषयांची दखल

खामगांव, दि. १५ प्रतिनिधी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने पर्यावरणाचे संवर्धन करण्याकरीता राबविलेल्या विविध कल्पनाप्रुक विषयांची दखल घेवून सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयास २०२० पर्यावरण पुरस्कार घोषीत झालेला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीच्या झालेल्या सभेमधे सर्वानुमते ठरावाव्दारे पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

शैक्षणिक संस्था प्रवर्गातील विद्यापीठाच्या अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा या पाचही जिल्हातील विविध विविध महाविद्यालयाकडुन प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. पर्यावरण समितीचे अध्यक्ष डॉ.अरुण चव्हाण, सदस्य विद्यापीठ व्यवस्थापन समिती प्राचार्य डॉ.निलेश गावंडे, सदस्य विद्यापीठ व्यवस्थापन समिती प्राचार्य डॉ.गजानन जाधव, डॉ.

अरुण पाटील, सदस्य व्यवस्थापन समिती व समितीचे सचिवअनिल पोम, यांच्या समितीव्दारे प्रवेशित प्राप्त झालेल्या महाविद्यालयांना भेट देवून पाहणी करण्यात आली होती.

महाविद्यालयाचे मागील ५ वर्षामध्ये औषधी वनस्पती विविध प्रजातीच्या १०६० वृक्षांची लागवड करण्यात येवून महाविद्यालयाचा परिसर वृक्षवल्लीव्दारे निसर्गरम्य करण्यात आला आहे. महाविद्यालयामध्ये दरवर्षी रोपवाटीकामध्ये रोपटयांची निर्मिती करुन महाविद्यालय, अंजब, शिवरखेड, बोरजवळा येथे लागवड व वाटप करण्यात आले होते. अपारंपारिक क्षमतेने उर्जा स्रोताचा वापर करुन महाविद्यालयाची सौर उर्जेवरील पथदिवे, उर्जा पॅनलव्दारे विजनिर्मिती करण्यात आली. पर्यावरण जागृतीकरीता वृक्षदिंडी, पर्यावरण दिन, वसुंधरा दिन, जलअभियान दिंडीव विविध उपक्रम घेण्यात आले. जैवविविधता संरक्षण व संवर्धनासाठी, पक्षी घरटे, पक्षी थांबे, वास्तु महाविद्यालयाव्दारे रानभाज्या प्रदर्शन आदिव्दारे जैवविविधता संरक्षण व संवर्धनाचे कार्य करण्यात आले.

यापूर्वी महाविद्यालयास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती राष्ट्रीय सेवा योजनामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शैक्षणिक कार्यासोबत उत्कृष्ट सामाजिक कार्याबदल २०१९ मध्ये कुलगुरु मा.डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी स्वच्छता पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद खामगांव यांनी गणेशोत्सवाच्या निर्माल्यापासून सेंद्रीय खत निर्मिती केल्याबदल प्रमाणपत्र देण्यात आले आहे. महाविद्यालयास मिळालेल्या पर्यावरण पुरस्काराबदल प्राचार्य डॉ. निलिमा देशमुख यांनी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, उपकुलगुरु डॉ. जयपुरकर व पर्यावरण पुरस्कार समितीचे आभार मानत आहे.

Various works done by the college in relation to environmental protection and conservation

शिंगणे कॉलेजचे हिवरखेड येथे वृक्षारोपण

खामगाव, (लाखनवाडा प्र. अमोल भेलनकर) स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालयाच्या वतीने हिवरखेड येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. दरवर्षी महाविद्यालय वेगवेगळ्या गावी वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेत असते. यावेळी महाविद्यालयाचे डॉ. दयानंद राऊत, प्रा. गोपाल राखोंडे, प्रा. संदीप लांडे वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी हजर होते. शेताच्या बांधावर आणि रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात आली. यावेळी गावचे सरपंच उपस्थित होते. गावच्या लोकांनी वृक्षारोपण कार्यक्रमाचे कौतुक केले. सरकारच्या वृक्षारोपण घोषणाचा अवलंब करुन महाविद्यालय दरवर्षी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमावर विशेष भर देते. वृक्षारोपणामुळे पर्यावरणाचे संतुलन सौम्य राहते व पाऊस पडण्यात मदत होते. असे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निलिमा देशमुख म्हणतात म्हणून गावोगावी वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेण्यात येतात.

लोकोपचार

सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्यावतीने अंत्रज येथे वृक्षारोपण

खामगाव (का.प्र.)- स्थानिक सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी ग्रामीण भागामध्ये वृक्ष लागवड करण्यात येत असते. मागील तीन वर्षापासून दत्तक ग्राम अंत्रज येथे महाविद्यालयाच्यावतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येत आहे. संस्थेचे सचिव डॉ.देशमुख व प्राचार्य डॉ.नीलिमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्रा.डॉ.दयानंद राऊत, प्रा.संदीप लांडे व सरपंच शिवराज महाले यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील तरुणांना डॉ.राऊत यांनी पर्यावरणाचे महत्व सांगून वृक्ष लागवडीमुळे पर्यावरणाचा समतोल राहू शकतो. त्यामुळे वृक्ष लागवड किती महत्वाची आहे आणि प्रत्येकांना दरवर्षी एक झाड लावून त्याच्या संगोपनाची जबाबदारी घेतली पाहिजे, याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी माजी विद्यार्थी संदीप वानखडे, बाबू येरुळकर, सुरज वानखडे, बुद्धभूषण वानखडे व गावकरी उपस्थित होते.

बायकोच्या ज्ञानाची चर्चा..

२०१० मध्ये पतीने ४ लाख रुपयांची कार खरेदी केली. पत्नीने ४ लाख रुपयांचे दागिने घेतले. आज, कारची पुनःविक्री मूल्य १ लाख आहे आणि पत्नीच्या दागिन्यांची पुनःविक्री किंमत १६ लाख रुपये आहे....

स्माईल प्लीज..

सायंदैनिक खामगाव फास्ट

सोमवार १० ऑगस्ट २०२० 2

शिंगणे महाविद्यालयतर्फे हिवरखेड व अंत्रज येथे वृक्षारोपण

खामगाव (का.प्र.) : तालुक्यातील हिवरखेड व अंत्रज येथे सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव च्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही ग्रामीण भागांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ.देशमुख व प्रा.डॉ.निलीमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरखेड येथे डॉ. दयानंद राऊत, प्रा. गोपाळ राखोंडे, प्रा. संदीप लांडे आदींची वृक्षारोपणाच्या केले. तसेच अंजज येथे महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.दयानंद राऊत, प्रा.संदीप लांडे, सरपंच शिवराज महाले यांचे उपस्थित वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील तरुण माजी विद्यार्थी संदीप वानखडे , बाबू येरुळकर , सुरज वानखडे, बुद्धभूषण वानखडे व बहुसंख्येने गावकरी उपस्थित होते.

सायंदैनिक खामगाव फास्ट

शिंगणे कॉलेजमध्ये वृक्षारोपण

खामगाव (का.प्र.) : स्थानिक सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्यावतीने ग्राम शेलोडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रम स्व.भाऊसाहेब फुंडकर व्यायाम शाळेच्या प्रांगणात घेण्यात आला. यावेळी सरपंच संतोष येवले, डॉ.प्रमोद चव्हाण, डॉ.दयानंद राऊत यांनी वृक्षारोपण केले. सदर महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येते. या उपक्रमासाठी सुरज सहस्त्रबुद्धे, संजय चौथारे यांनी विशेष प्रिश्रम घेतले.

शिंगणे महाविद्यालयाच्यावतीने वृक्षरोप वाटप

खामगाव (का.प्र.) : स्थानिक सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाच्या वतीने चांदमारी येथील संत रोहिदास महाराज मंदिर परिसरात वृक्ष लागवडीसाठी नितेश खरात व मित्र परिवार यांना महाविद्यालयातील प्रा.डॉ.दयानंद राऊत यांच्या हस्ते वृक्षरोप वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.नीलिमा देशमुख, डॉ.प्रमोद चव्हाण, मनोहर वासनिक, धनंजय महाले, संदीप देशपांडे, प्रमोद पायस, आनंद चव्हाण उपस्थित होते.

शिंगणे कॉलेजतर्फे सात हजाराच्या वर वृक्षांचे संवर्धन

खामगाव (प्रतिनिधी) - सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव द्वारा १० हजाराच्या वृक्षरोपण करण्यात आले. पर्यावरणाचा ऱ्हास लक्षात घेता महाविद्यालयाने सतत गावोगावी जावून वृक्षारोपणाचे उपक्रम राबविले. महाविद्यालयाच्या परिसरात देखील एक हजाराच्या वर वृक्षाची लागवड केली. यामध्ये फामकस, पाम, निंब, गुलमोहर, सप्तपर्णी, किर्येमा, करज, अशोका इत्यादी वृक्षलागवड करण्याबरोबरच गावातील लोकांनी आणि महाविद्यालयाने वृक्षसंवर्धनाची बाबदारी स्विकारली. याबरोबर महाविद्यालयाने जैवविविधता, जलसंधारण इत्यादी उपक्रमात महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण संवर्धन हे उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.निलीमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. १ हजार १८५ वृक्षापैकी ७ हजाराच्या वर वृक्षाचे संवर्धन करण्यात आले.

कच घाव

शिंगणे कॉलेजच्या परिसरातील झाडावर पक्षांचा निवास

खामगाव, (लाखनवाडा प्र. अमोल भेलनवर) : स्थानिक सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयाचा परिसरात सुरुवातीलाच मोठ्याप्रमाणात वृक्षारोपण करण्यात आल्यामुळे आता मोठमोठी झाडे झाली आहेत. त्या झाडांवर अनेक पक्षांनी आपली घरटी बांधली आहेत. पक्षांना थांबण्यासाठी परिसरातील प्रत्येक झाडावर पाणीपात्र बांधण्यात आले आहेत. कडक उन्हाळ्यात देखील पाणीपात्र पाण्याने भरुन ठेवल्यामुळे त्यांची तहान भागत होती. आता महाविद्यालयाच्या परिसरातील झाडांवर पक्षांचा किलबिलाट असतो पामच्या झाडावर तर सुगरणी या पक्षाने आपले घरही थाटली आहेत. महाविद्यालय पर्यावरण संवर्धनसाठी नेहमीच सदग असते. पर्यावरणाचे संतुलन रहावे यासाठी महाविद्यालय सतत अग्रेसर असते महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण झाल्यामुळे परिसरम फुलून गेला आहे. पर्यावरण संतुलनामध्ये पक्षाचे देखील महत्व आहे. म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निलीमा देशमुख वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, पक्षीथांबे, पाणीपात्र क्रियाशील ठेवावे असे मार्गदर्शन करतात.

शिंगणे महाविद्यालयाच्या वतीने अंत्रज येथे वृक्षारोपण

खामगाव : स्थानिक अंत्रज येथे सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव च्या वतीने दरवर्षी प्रमाणे ग्रामीण वघामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. मागील तीन वर्षापासून दतक ग्राम अंत्रज येथे महाविद्यालयाच्या वतीने ग्राम अंत्रज येथे विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येत आहे.

संस्थेचे सचिव डॉ.देशमुख साहेब व प्राचार्य डॉ.निलिमा देशमुख यांचे मार्गदर्शखाली महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.दयानंद राऊत व प्रा.संदीप लांडे व गावचे सरपंच शिवराज महाले यांचे उपस्थित वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील तरुणांना डॉ.राऊत यांनी पर्यावरणाचे महत्व सांगून वृक्ष लागवडीमुळे पर्यावरणाचा समतोल राह शकतो त्यामुळे वृक्ष लागवड किती महत्वाची आहे आणि प्रत्येकांना दरवर्षी एक झाड लावून त्याची संगोपनाची जबाबदारी घेतली पाहिजे अशा प्रकारचे अमूल्य मार्गदर्शन केले. यावेळी गावातील तरुण माजी विद्यार्थी संदीप वानखडे , बाबू वेरुळकर , सुरज वानखडे , बुद्धभूषण वानखडे व बहुसंख्येने गावकरी उपस्थित होते.

Environmental Protection and Conservation

Session 2020-2021

Index

Sr. No.	Name of Activity / Programme	Page No
1	Sapling distribution for student and villager's	38 to 41

Sapling distribution for student and villager's

Sapling distribution for student and villager's

Sapling distribution for student and villager's

Sapling distribution for student and villager's

Environmental Protection and Conservation

Session 2021-2022

Index

Sr. No.	Name of Activity / Programme	Page No
1	Cleanness drive in college campus	43
2	Tree plantation in NSS camp at adopted village	44
3	Sapling distribution for student and villager's	45 to 46
4		

Cleanness drive in college campus

Tree plantation in NSS camp at adopted village

Sapling distribution for villagers

Sapling distribution for villagers

The Organic fertilizer produced from 'Nirmalya' was made available to the community

Supporting Documents of Best Practice

Environmental protection and conservation

Sr.No.	Names	Link
1	Awards	http://smbscoll.edu.in/pdf/AWARDS_Green_Initiatives_new.pdf
2	Environment Committee	http://smbscoll.edu.in/pdf/Environment_Committee.pdf
3	Green Campus Initiatives	http://smbscoll.edu.in/pdf/cwm_criteria7/Green_campus_initiatives.pdf
4	Green Audits	http://smbscoll.edu.in/pdf/cwm_criteria7/Green%20audit%20and%20environment%20audit.pdf
5	Clean and Green Campus	http://smbscoll.edu.in/pdf/cwm_criteria7/Clean%20and%20Green%20Campus%20Initiatives.pdf
6	Beyond the campus environmental promotion activities.	http://smbscoll.edu.in/pdf/cwm_criteria7/Beyond%20the%20campus%20environmental%20promotion%20activities.pdf